Gokhale Education Society's

SMRK-BK-AK Mahila Mahavidyalaya, Nashik.

EVENT REPORT – DEPT. OF MARATHI

Name of the Programme	**Vachan Prerna Din (वाचन प्रेरणा दिन)**
Day and Date	Saturday, 15th Oct. 2026
Organising Committee/Department (Mention Collaborating Agency)	**मराठी विभाग आणि अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित Dept. of Marathi collaborated with Akhil Bhartiya Sahitya Parishad Sahitya Bharati**
Time	11.00 a.m to 1.00 p.m
Topic /Theme	**1) पुस्तकचर्चा – डोईचा पदर आला खांद्यावरी**
Resource Person/s	➢ श्रीमती शोभा त्रिभुवन ➢ डॉ. सौ. संध्या खेडेकर, प्राचार्या ➢ सौ. तन्वी अमित ➢ श्री. प्रशांत भरवीरकर
Students and staff attended the Programme	**Day 1 – 15/10/2026 – 50 students – 15 Staff**
Brief Summary	गुरुवार दि. १५ आॅक्टोबर २०२६ रोजी मराठी विभाग आणि अखिल भारतीय साहित्य परिषदेचे साहित्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचन प्रेरणा दिन संपन्न झाला. पुस्तक चर्चा उपक्रमात *डोईचा पदर आला खांद्यावरी* या पुस्तकावर विचार मांडताना प्रमुख अतिथी वक्ता म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयक श्रीमती शोभा त्रिभुवन बोलत होत्या. छाया महाजन यांनी लिहिलेल्या या स्त्रीवादी कादंबरीत ७० च्या दशकात घडलेल्या स्त्री जीवनाचे चित्रण येते, पण दशकं लोटली आणि वेशभूषा बदलत चालली तरी आजही स्त्रीला चांगली मुलगी, चांगली सून, चांगली संसार करणारी गृहिणी आणि या सगळ्यांबरोबर एक चौथा जाड पदर म्हणजे लोक काय म्हणतील? याचं सातत्याने अवधान बाळगावं लागतं. म्हणूनच मध्ययुगीन काळातील विद्रोह करू पाहणारी संत जनाबाई जशी होती तश्या आजही अनेक जनाबाई आहेत. पुस्तकाच्या शीर्षकाची सार्थता पटवून देत त्यांनी एका सर्वसामान्य मुलीचा आत्मभानाचा परीघ प्रभावीपणे मांडला. छाया महाजन यांच्या लेखनाचा परिचय करून देत त्यांनी सदर कथानकातील विविध टप्प्यांची उदाहरणे दिली. पद्माकर देशपांडे, डॉ सायली आचार्य, प्रा. राजेंद्र डालकरी या चर्चेत सहभागी झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ संध्या खेडेकर होत्या. ध्येय उच्च असलं की स्वप्नपूर्ती निश्चितच होते हे सांगत त्यांनी भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम यांच्या ध्येयाधिष्ठित वाटचालीचा आढावा घेतला. विशेष अतिथी म्हणून

	साहित्य भारतीच्या जिल्हा अध्यक्षा सौ. तन्वी अमित आणि शहर अध्यक्ष प्रशांत भरवीरकर उपस्थित होते. तन्वी अमित यांनी साहित्य भारती आणि मराठी विभाग आयोजित कार्यक्रमाविषयी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी मंचावर साहित्य भारतीच्या प्रांत कार्यकारिणी सदस्य सौ. आरती शिरवाडकर, उपप्राचार्य डॉ नितीन सोनगीरकर होते. याप्रसंगी अभिजात भाषा सप्ताहात काव्यवाचन स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या विद्यार्थिनी कु. वैशाली मोरे, सई वाळे, कोमल बागूल, आर्या राणे, अंशिका सिंह, मनिषा सोनार, गिरिजा वर्तक, सविता माघाडे यांना बक्षीसे देण्यात आली. तसेच युवा महोत्सवात नाट्यप्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या संघाचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विभाग प्रमुख प्रा. प्रशांत अहिरे यांनी केले. मान्यवरांचा परिचय साहित्य भारती च्या पुस्तक चर्चा प्रमुख आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ सायली आचार्य यांनी करून दिला तर डॉ उज्ज्वला लांडगे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन कु. सई वाळे आणि सविता माघाडे या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमासाठी साहित्य भारती चे मधुरा गोरे, पद्माकर देशपांडे, डॉ सागर चौधरी, कु. तन्मयी करमुंगीकर यांचेसह एमसीव्हीसी समन्वयक सौ. मैथिली लाखे, स्टाफ सेक्रेटरी डॉ सतीश धनवडे आणि अनेक प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दीपाली पटेकर, संध्या खिल्लारे, सई वाळे, सविता माघाडे, वैशाली मोरे, कल्पना मोरे, रीना बिंद, समीक्षा अंभोरे, विदिशा दाणी यांनी प्रयत्न केले.

प्रा. प्रशांत अहिरे
मराठी विभागप्रमुख

डॉ. नितीन सोनगीरकर
उपप्राचार्य

डॉ. संध्या खेडेकर
प्राचार्या

मराठी विभाग आयोजित

अभिजात मराठी भाषा सप्ताह ऑक्टोबर २०२६

अभिजात मराठी भाषा सप्ताह ई – बॅनर



वाचन प्रेरणा दिनी महाविद्यालयातील फलक लेखन

वाचन प्रेरणा दिनानिमित्त आज 'पुस्तक चर्चा'

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

एसएमआरके महिला महाविद्यालयातील मराठी विभाग आणि 'अखिल भारतीय साहित्य परिषद' संचलित 'साहित्य भारती' यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १५) 'वाचन प्रेरणा दिना'चे औचित्य साधून विशेष 'पुस्तक चर्चा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयातील पाटणकर सभागृहात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पार पडणार आहे.

अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर असतील. तर 'साहित्य भारती'च्या जिल्हा कार्यकारिणी अध्यक्षा तन्वी अमित व शहर कार्यकारिणी अध्यक्ष प्रशांत भरवीरकर यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे. 'अभिजात भाषा सप्ताहा'निमित्त काव्यवाचन स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे. 'पुस्तक चर्चा' उपक्रमाचे आयोजन मराठी विभागातील सहायक प्राध्यापक तथा साहित्य भारती नाशिक जिल्हा कार्यकारिणीच्या 'पुस्तक चर्चा' प्रमुख डॉ. सायली आचार्य यांनी केले आहे. या वैचारिक व सांस्कृतिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. प्रशांत अहिरे यांनी केले आहे.





वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित पुस्तक चर्चा उपक्रमात दीपप्रज्वलन करताना विशेष अतिथी सौ. तन्वी अमित, जिल्हाध्यक्षा, साहित्य भारती



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मराठी विभागप्रमुख प्रा. प्रशांत अहिरे



वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित पुस्तक चर्चा उपक्रमात प्रतिमापूजन करताना साहित्य भारतीच्या कार्यकारिणी सदस्य सौ. मधुरा गोरे



सौ. तन्वी अमित यांचा सत्कार करताना प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर



डोईचा पदर आला खांद्यावरी पुस्तकावर विचार व्यक्त करताना प्रमुख अतिथी श्रीमती शोभा त्रिभुवन



डोईचा पदर आला खांद्यावरी पुस्तकावर विचार व्यक्त करताना प्रमुख अतिथी श्रीमती शोभा त्रिभुवन



पुस्तकचर्चेत सहभागी होताना सहा. प्राध्यापक डॉ. सायली आचार्य



कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने करताना सहा. प्राध्यापक डॉ. उज्ज्वला लांडगे

		
अभिजात भाषा सप्ताहात आयोजित काव्यवाचन स्पर्धेची विजेती कु. वैशाली मोरे हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार	अभिजात भाषा सप्ताहात आयोजित काव्यवाचन स्पर्धेची विजेती कु. सई बाळे हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार	अभिजात भाषा सप्ताहात आयोजित काव्यवाचन स्पर्धेची विजेती सविता माघाडे हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

प्रा. प्रशांत अहिरे	डॉ. नितीन सोनगीरकर	डॉ. संध्या खेडेकर
मराठी विभागप्रमुख	उपप्राचार्य	प्राचार्या